Epaper

डिजिटल क्रांतीची धगधगती मशाल

MSME - MH-33 -0714843

दैनिक जन सम्राट टाईम्स

सत्याचे प्राईम्स

मुख्य संपादक: मुकुंदराव शामराव नंन्नवरे

। शनिवार, दि. २ मे २०२६ । वर्ष १ । अंक २७ । पाने २।

DIGITAL EDITION

नशिराबादचे ग्रामदैवत प.पू. झिपरु अण्णा महाराज यांचा पुण्यतिथी सोहळा

(पान २ वर)



## ९ ट्रिलियन डॉलर्स अर्थव्यवस्थेचा संकल्प - राज्यपाल जिष्णु देव वर्मा

# ‘विकसित महाराष्ट्र-2047’ कडे वेगवान वाटचाल!

## छत्रपती शिवाजी महाराज मैदानावरील समारंभात राज्यपालांच्या हस्ते राष्ट्रध्वजवंदन

जन सम्राट टाईम्स

मुंबई । स्वातंत्र्याच्या अमृत काळानंतर आता देश विकसित भारत २०४७ कडे वाटचाल करत आहे. यात महाराष्ट्राचे योगदान अतुलनीय असून, प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या ५ ट्रिलियन डॉलर्सच्या संकल्पनेत महाराष्ट्राचा ‘१ ट्रिलियन डॉलर्स’ अर्थव्यवस्थेचा वाटा असेल. राज्य शासनाने तयार केलेले ‘विकसित महाराष्ट्र २०४७ हे व्हिजन डॉक्युमेंट राज्याला प्रगतीच्या नव्या शिखरावर नेऊन ठेवेल, असा विश्वास राज्यपाल जिष्णु देव वर्मा यांनी व्यक्त केला.

समाजातील प्रत्येक घटकाचा सक्रीय सहभाग सुनिश्चित करुन सर्वसमावेशक, प्रगत आणि विकसित महाराष्ट्र घडविण्यासाठी प्रयत्न करुया, असे आवाहन राज्यपाल जिष्णु देव वर्मा यांनी केले. छत्रपती शिवाजी महाराज मैदानावर आयोजित समारंभात राज्यपालांच्या हस्ते ध्वजवंदन करण्यात आले. याप्रसंगी विधान परिषद सभापती प्रा. राम शिंदे, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, मुंबईच्या महापौर रितू तावडे, स्थानिक लोकप्रतिनिधी, मुख्य सचिव राजेश अग्रवाल, बृहन्मुंबई आयुक्त अश्विनी भिडे, शासनाच्या विविध विभागांचे अपर मुख्य सचिव, पोलीस महासंचालक सदानंद दाते, पोलीस आयुक्त देवेन भारती, अपर पोलीस महासंचालक (प्रशासन) मधुकर



पांडे, मुख्य राजशिष्टाचार अधिकारी डॉ. राजेश गवांदे, विविध विभागांचे प्रधान सचिव, वरिष्ठ शासकीय आणि पोलीस अधिकारी, तिन्ही सैन्य दलांचे वरिष्ठ अधिकारी, विविध देशांचे वरिष्ठ राजनैतिक अधिकारी आदी उपस्थित होते. उपस्थितांनी राष्ट्रगान, राष्ट्रगीत आणि राज्यगीताने ध्वजाला मानवंदना दिली. राज्यपालांनी जगभरातील मराठी जनतेला महाराष्ट्र दिनाच्या शुभेच्छा देऊन संयुक्त महाराष्ट्राच्या निर्मितीसाठी बलिदान दिलेल्या हुतात्म्यांना आदरांजली अर्पण केली. त्याचप्रमाणे कामगारांच्या आणि श्रमिकांच्या घामातून हा महाराष्ट्र घडल्याचा उल्लेख करून आंतरराष्ट्रीय कामगार दिनानिमित्त शुभेच्छा दिल्या. राज्यपाल म्हणाले की, महाराष्ट्राने जागतिक गुंतवणुकदारांचा विश्वास संपादन केला आहे. दावोस येथील वर्ल्ड इकॉनॉमिक फोरममध्ये तब्बल 31 लाख 25 हजार कोटी रुपयांचे सामंजस्य करार करण्यात आले आहेत. राज्याच्या नवीन उद्योग आणि गुंतवणूक धोरणातून 70.5 लाख कोटींची गुंतवणूक आकर्षित करण्याचे उद्दिष्ट असून, त्यातून 50 लाख प्रत्यक्ष रोजगार निर्माण होणार आहेत. परकीय गुंतवणुकदारांना आकर्षित करण्यासाठी राजशिष्टाचार विभागात स्वतंत्र ‘परकीय थेट गुंतवणूक’ कार्यासने निर्माण करून प्रशासकीय गती वाढवली आहे. राज्यातील पायाभूत सुविधांच्या विकासाबाबत राज्यपाल म्हणाले की, महाराष्ट्रात पायाभूत सुविधा व सेवा विकासाला गती देण्यासाठी मित्रा मार्फत तयार केलेले पब्लिक-प्रायव्हेट पार्टनरशिप (पीपीपी) धोरण 2026 राज्य शासनाने मंजूर केले आहे.

### बळीराजाला बळ आणि सौर उर्जेचा विश्वविक्रम

शेतकरी कल्याणासाठी शासन कटिबद्ध असल्याचे सांगताना राज्यपालांनी नमूद केले की, खरीपात नैसर्गिक आपत्तीमुळे नुकसान झालेल्या एक कोटींहून अधिक शेतकऱ्यांना 15 हजार 950 कोटी रुपयांची मदत थेट वितरित करण्यात आली आहे. तसेच चालू रब्बी हंगामात नुकसानग्रस्त एक लाख 80 हजार शेतकऱ्यांना 128 कोटी रुपयांची मदत दिली आहे. बँकांच्या माध्यमातून आतापर्यंत शेतकऱ्यांना 50 हजार 914 कोटी रुपये इतकी पीक कर्जाची रक्कम वितरीत करण्यात आली आहे. मुख्यमंत्री बळीराजा मोफत वीज योजनेंतर्गत साडेसात अश्वशक्ती क्षमतेपर्यंतच्या सुमारे 45 लाख शेतीपंपाना एकूण 25 हजार 87 कोटी रुपये वीजदर सवलत देण्यात आली. ऑक्टोबर-नोव्हेंबर 2025 मध्ये स्थापित केलेल्या 45 हजार 911 सौर पंपांच्या विक्रमाची नोंद ‘गिनीज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड’मध्ये झाली असून, महाराष्ट्र शाश्वत ऊर्जेत देशाला दिशा दाखवत आहे.राज्यपाल म्हणाले ‘मुख्यमंत्री विद्यार्थी विज्ञान वारी’ अंतर्गत उत्कृष्ट विद्यार्थ्यांना ‘इस्रो’ आणि अमेरिकेतील ‘नासा’ यांसारख्या नामांकित संस्थांना भेट देण्याची संधी मिळणार आहे. यामुळे राज्यातील ग्रामीण भागातील विद्यार्थी जागतिक दर्जाच्या तंत्रज्ञानाशी जोडले जातील.

Selected

## प्रसिद्ध जीनोम शास्त्रज्ञ जे. क्रेग वेंटर यांचे निधन

सॅन डिएगो | प्रसिद्ध अमेरिकन शास्त्रज्ञ आणि मानवी जीनोम डिकोड करण्यात मोलाची भूमिका बजावणारे जे. क्रेग वेंटर यांचे वयाच्या ७९ व्या वर्षी निधन झाले. 'जे. क्रेग वेंटर इन्स्टिट्यूट' (जेसीव्हीआय) ने दिलेल्या अधिकृत माहितीनुसार, बुधवारी, २९ एप्रिल २०२६ रोजी सॅन डिएगो येथे त्यांनी अखेरचा श्वास घेतला. २००० साली त्यांनी 'सेलेरा जीनोमिक्स' या त्यांच्या खाजगी कंपनीच्या माध्यमातून मानवी डीएनएचे ३.१ अब्ज रासायनिक घटक डिकोड करण्याची महत्त्वपूर्ण कामगिरी करून दाखवली होती. त्यांच्या या संशोधनामुळे कर्करोग आणि हृदयविकारांसारख्या अनेक गंभीर आजारांमागील अनुवांशिक (जेनेटीक) कारणे शोधणे आणि भविष्यातील उपचारांच्या पद्धती विकसित करणे वैद्यकीय विज्ञानाला शक्य झाले. स्वतःच्या जीनोमची संपूर्ण माहिती सार्वजनिक करणारे ते जगातील पहिले व्यक्ती होते.

जन सम्राट टाईम्स ब्रेक न्यूज

## नार–पार–गिरणा नदीजोड प्रकल्पाला गती

जन सम्राट टाईम्स



जळगाव : उत्तर महाराष्ट्रातील दुष्काळी भागासाठी जीवनदायी ठरणाऱ्या बहुचर्चित नार–पार–गिरणा नदीजोड प्रकल्पाला अखेर निर्णायक गती मिळाली आहे. प्रकल्पाच्या पहिल्या टप्प्यातील सुमारे ₹4116.10 कोटींच्या निविदा प्रक्रियेला शासन स्तरावरील समितीने मान्यता दिल्याने आता लवकरच कार्यारंभ आदेश (WORK ORDER) पारित होण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. ही माहिती राज्याचे शालेय शिक्षणमंत्री ना. दादाजी भुसे यांनी दिली.

उत्तर महाराष्ट्रातील विशेषतः नाशिक व जळगाव जिल्ह्यातील पाणीटंचाईचा प्रश्न कायमस्वरूपी सोडवण्यासाठी हा प्रकल्प अत्यंत महत्त्वाचा मानला जात आहे. पश्चिमेकडे वाहून अरबी समुद्रात जाणारे अतिरिक्त पाणी वळवून गिरणा खोऱ्यात आणण्याची संकल्पना या प्रकल्पामागे आहे. यामुळे सिंचन, पिण्याचे पाणी आणि भविष्यातील औद्योगिक विकासासाठी मोठा आधार निर्माण होणार आहे. पाण्याचा मोठा लाभ प्रकल्पाच्या पहिल्या टप्प्यातून सुमारे 10.64 TMC पाणी उपलब्ध होणार असून त्याचा थेट लाभ नाशिक आणि जळगाव जिल्ह्याला होणार आहे. अंदाजे 1 लाख 23 हजार 790 एकर क्षेत्र सिंचनाखाली येणार असून कोरडवाहू शेतीला मोठा दिलासा मिळणार आहे. जलसंपदा विभागाच्या माहितीनुसार, या योजनेअंतर्गत अनेक धरणे, बोगदे आणि जलवाहिन्यांचे जाळे उभारण्यात येणार आहे.

### प्रकल्पामागील मोठी संकल्पना काय?

सुरगाणा परिसरातून वाहणाऱ्या नार, पार, औरंगा व अंबिका नद्यांचे अतिरिक्त पाणी सध्या समुद्रात जाते. हेच पाणी अडवून गिरणा उपखोऱ्याकडे वळवण्याची योजना आखण्यात आली आहे. यासाठी सुमारे ३७ किलोमीटर लांबीचे बोगदे, धरणांची साखळी आणि जलवाहिन्या उभारल्या जाणार आहेत. जळगाव जिल्ह्यातील एरंडोल, चाळीसगाव, भडगाव, अमळनेर, . गिरणा खोऱ्यात अतिरिक्त पाणी आल्यास या भागातील शेतीला मोठा आधार मिळेल. भविष्यात पिण्याच्या पाण्याचा प्रश्नही मोठ्या प्रमाणात सुटण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

## एकनाथ शिंदे यांच्या हस्ते ठाणे जिल्हा जनगणनेचा शुभारंभ

जन सम्राट टाईम्स

ठाणे | प्रतिनिधी राष्ट्रीय जनगणनेला 1 मे पासून देशव्यापी सुरुवात झाली असून उपमुख्यमंत्री तथा ठाणे जिल्ह्याचे पालकमंत्री एकनाथ शिंदे यांनी स्वगणना करीत ठाणे जिल्ह्यातील जनगणनेचा शुभारंभ केला. या जनगणनेसाठी नागरिकांनी सहकार्य करण्याचे आवाहन उपमुख्यमंत्र्यांनी केले. ठाणे महापालिकेच्या मुख्यालयात झालेल्या या शुभारंभ कार्यक्रमासाठी महापौर शर्मिला पिंप्रोळकर, उपमहापौर कृष्णा पाटील, महापालिका आयुक्त सौरभ राव, जिल्हाधिकारी श्रीकृष्ण पांचाळ, अतिरिक्त आयुक्त संदीप माळवी, जनगणना सहसंचालक रमेश भोसले आदी मान्यवर उपस्थित होते. यावेळी स्व-गणनेसाठी असलेल्या क्यूआर कोडचे अनावरण उपमुख्यमंत्री श्री. शिंदे यांच्या हस्ते झाले. त्यांनी टॅबवर हा कोड स्कॅन करून स्व-गणना केली. दिनांक १ ते १५ मे हा स्व-गणनेचा कालावधी असून त्यानंतर १६ मे ते १४ जून याकलावधीत घरोघरी जाऊन जनगणना केली जाणार आहे. यावेळी विकास आणि प्रगती या स्टॉलचे उद्घाटन करण्यात आले. जनगणनामोहिमेसाठी तयार करण्यात आलेल्या सेल्फी पॉइंटचे उद्घाटनदेखील त्यांनी केले. यावेळी उपमुख्यमंत्री श्री. शिंदे यांना सहसंचालक भोसले यांच्या हस्ते केंद्रीय गृहमंत्रालयाचे स्मृती चिन्ह देण्यात आले.

## बलिदानातून घडलेले महाराष्ट्र राज्य विकासाचे ग्रोथ इंजिन - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

### राज्याच्या ६७ व्या स्थापना दिनानिमित्त हुतात्मा स्मारकास अभिवादन

जन सम्राट टाईम्स

मुंबई | प्रतिनिधी महाराष्ट्र राज्याच्या ६७ व्या स्थापना दिनानिमित्त मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी हुतात्मा चौक येथे हुतात्मा स्मारकास पुष्पचक्र अर्पण करून अभिवादन केले. महाराष्ट्र ही जगातील ३० व्या क्रमांकाची अर्थव्यवस्था असल्याचे सांगून बलिदानातून घडलेले महाराष्ट्र राज्य आज देशाच्या विकासाचे ‘ग्रोथ इंजिन’ असल्याची भावना मुख्यमंत्र्यांनी यावेळी व्यक्त केली. कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता मंत्री मंगलप्रभात लोढा, मुंबईच्या महापौर रितू तावडे, मुख्य सचिव राजेश अग्रवाल, पोलीस महासंचालक सदानंद दाते, बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या आयुक्त अश्विनी भिडे, बृहन्मुंबई पोलीस आयुक्त देवेन भारती, मुंबई शहर जिल्हाधिकारी आंचल गोयल आदी यावेळी उपस्थित होते. ‘दिल्लीचेही तख्त राखितो महाराष्ट्र माझा’ या महाराष्ट्र गीतातील ओळींचा उल्लेख करत मुख्यमंत्री फडणवीस यांनी राज्याच्या



ऐतिहासिक योगदानाची आठवण करून दिली. महाराष्ट्र दिन हा प्रत्येकासाठी अभिमानाचा आणि प्रेरणेचा दिवस असल्याचे त्यांनी सांगितले. कामगार दिनानिमित्त मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी कामगारांना शुभेच्छा दिल्या. लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या विचारांचा उल्लेख करत ‘पृथ्वी शेषनागाच्या डोक्यावर नाही, तर कामगाराच्या तळहातावर असते,’ असे सांगून कामगारांच्या योगदानाचे त्यांनी कौतुक केले. राज्याच्या तसेच देशाच्या प्रगतीत कामगारांचा मोठा वाटा असून त्यांच्या श्रमांमुळेच संपन्नतेची उभारणी झाली आहे, असे सांगत मुख्यमंत्री फडणवीस यांनी सर्व कामगारांना अभिवादन केले.

## जळगावात बुद्ध जयंतीनिमित्त शोभायात्रा; उपासक-उपासिकांचा उत्स्फूर्त सहभाग

जन सम्राट टाईम्स

जळगाव | प्रतिनिधी : जळगाव शहरात बुद्ध जयंती निमित्त विविध धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आलेशोभायात्रेत मोठा सहभाग कार्यक्रमानंतर शहरात भव्य शोभायात्रा काढण्यात आली. “संवाद” या संकल्पनेवर आधारित या मिरवणुकीत बौद्ध उपासक-उपासिकांनी मोठ्या संख्येने सहभाग घेतला. विविध ठिकाणी जयघोष आणि धार्मिक घोषणांनी वातावरण



भारावून गेले. सर्व स्तरातील उपस्थिती या कार्यक्रमाला राजकीय, सामाजिक आणि शैक्षणिक क्षेत्रातील मान्यवर, पदाधिकारी तसेच कार्यकर्त्यांनी उपस्थित राहून बुद्ध जयंती साजरी केली. समाजात बंधुता, समता आणि शांततेचा संदेश देणारा हा उत्सव उत्साहात पार पडला. बुद्धांच्या विचारांचा संदेश कार्यक्रमाच्या माध्यमातून भगवान बुद्धांच्या अहिंसा,समतेच्या विचारांचा प्रसार करण्यात आला. समाजात सलोखा आणि एकात्मता वाढवण्यासाठी अशा उपक्रमांची गरज असल्याचे मत यावेळी व्यक्त करण्यात आले.

## उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्या हस्ते बीड जिल्ह्यातील जनगणनेचा शुभारंभ

जन सम्राट टाईम्स

बीड | प्रतिनिधी राज्याच्या उपमुख्यमंत्री तथा बीड जिल्ह्याच्या पालकमंत्री श्रीमती सुनेत्रा अजित पवार यांच्या हस्ते शुक्रवारी जनगणना २०२७ अंतर्गत स्वगणनेचा शुभारंभ उत्साहात करण्यात आला. त्यांनीअधिकृत संकेतस्थळावर स्वतः लॉगिन करून स्वतःची प्राथमिक माहिती भरत स्वगणनेचा शुभारंभ केला. १ मे ते १५ मे दरम्यान होणाऱ्या स्वगणना



व घरगणनेच्या प्रक्रियेचा यावेळी औपचारिक प्रारंभ करण्यात आला. कार्यक्रमास जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन, मुख्य कार्यकारी अधिकारी जितीन रहमान व पोलीस अधीक्षक नवनीत कावत यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी व उपजिल्हाधिकारी शैलेश सूर्यवंशी यांच्या मार्गदर्शनाखाली बीड जिल्हा जनगणना कार्यालयाच्या वतीने उपजिल्हाधिकारी प्रभोदय मुळे व जिल्हा समन्वयक आशिष शिंदे यांनी स्वगणनेची माहिती सांगितली. जनगणना ही देशाच्या नियोजनासाठी अत्यंत महत्त्वाची प्रक्रिया असून, सर्व नागरिकांनी स्वगणनेत सहभागी होऊन अचूक माहिती देण्याचे आवाहन सुनेत्रा पवार यांच्या वतीने करण्यात आले.

जन सम्राट टाईम्स अँकर न्यूज

## ग्रामपंचायत गैरव्यवहारांवर शासनाचा मोठा दणका!

### सरपंच, उपसरपंच, सदस्य व कर्मचाऱ्यांवर थेट फौजदारी गुन्हे दाखल होणार

गुरु शिंदे
जन सम्राट टाईम्स

मुंबई : राज्यातील ग्रामपंचायतींचा कारभार अधिक पारदर्शक, जबाबदार आणि भ्रष्टाचारमुक्त करण्यासाठी महाराष्ट्र शासनाने कठोर पाऊल उचलले आहे. ग्रामपंचायतींमधील आर्थिक गैरव्यवहार, निधीचा अपहार, खोटी कागदपत्रे तयार करणे किंवा मूळ नोंदींमध्ये फेरफार करणाऱ्या सरपंच, उपसरपंच, सदस्य तसेच ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांविरुद्ध आता कोणतीही पूर्व चौकशी न करता थेट फौजदारी गुन्हे दाखल करण्याचे स्पष्ट आदेश ग्रामविकास विभागाने दिले आहेत. ग्रामपंचायती स्तरावर अनेक ठिकाणी विकासकामांच्या नावाखाली निधी गैरव्यवहार, बनावट बिल, खोटी मोजमापे, बनावट कागदपत्रे आणि आर्थिक अनियमिततेच्या तक्रारी सातत्याने समोर येत होत्या. या पार्श्वभूमीवर शासनाने सुधारित धोरण स्वीकारत आता संबंधितांवर थेट गुन्हे नोंदविण्याची भूमिका घेतल्याचे समजते. शासनाच्या निर्देशानुसार, ग्रामपंचायत नोंदी, ठराव, आर्थिक दस्तऐवज किंवा विकासकामांच्या कागदपत्रांमध्ये फेरफार करून खोटी माहिती तयार करणे हा गंभीर फौजदारी गुन्हा मानला जाणार आहे. अशा प्रकरणांमध्ये संबंधित पदाधिकारी आणि कर्मचाऱ्यांवर तात्काळ पोलिसांत गुन्हे दाखल करण्यात येणार आहेत. ज्या प्रकरणांमध्ये अद्याप प्राथमिक चौकशी झालेली नाही, त्या प्रकरणांमध्ये संबंधित




गटविकास अधिकाऱ्यांनी (BDO) एका महिन्याच्या आत चौकशी पूर्ण करणे बंधनकारक करण्यात आले आहे. चौकशीत दिरंगाई किंवा टाळाटाळ झाल्यास संबंधित अधिकाऱ्यांवर मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांमार्फत शिस्तभंगाची कारवाई करण्याचे निर्देशही देण्यात आले आहेत. राज्यातील हजारो ग्रामपंचायतींमध्ये विकासनिधी, जलजीवन मिशन, ग्रामसडक, घरकुल, स्वच्छता आणि विविध योजनांच्या निधीबाबत तक्रारी येत असतात. अलीकडच्या काळात अनेक पंचायत स्तरावरील गैरव्यवहार प्रकरणांत गुन्हे दाखल झाल्याने शासन अधिक सतर्क झाल्याचे चित्र आहे. बीड जिल्ह्यातील प्रधानमंत्री आवास योजनेतील कोट्यवधींच्या गैरव्यवहार प्रकरणात अलीकडेच अधिकाऱ्यांवर FIR दाखल करण्यात आली होती.

#### पारदर्शक प्रशासनावर भर

राज्य शासनाच्या या निर्णयामुळे ग्रामपंचायत स्तरावरील आर्थिक व्यवहारांवर अधिक नियंत्रण येणार असून स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये पारदर्शकता वाढेल, असा दावा प्रशासनातील वरिष्ठ अधिकाऱ्यांकडून केला जात आहे. मात्र दुसरीकडे, “तक्रारींचा गैरवापर होऊ नये आणि निष्पक्ष चौकशी व्हावी,” अशी अपेक्षा काही ग्रामपंचायत पदाधिकाऱ्यांनी व्यक्त केली आहे.

#### ग्रामीण राजकारणात खळबळ

ग्रामविकास विभागाच्या या निर्णयामुळे राज्यातील ग्रामीण राजकारणात मोठी खळबळ उडाली आहे. अनेक ग्रामपंचायत पदाधिकारी आता आर्थिक व्यवहार, मंजुरी प्रक्रिया आणि दस्तऐवज हाताळताना अधिक सतर्क झाले असून, आगामी काळात ग्रामपंचायत प्रशासनावर याचे दूरगामी परिणाम दिसण्याची शक्यता व्यक्त होत आहे.

## धुळे जिल्ह्यात ‘राजा शिवाजी’ चित्रपटाचे भव्य मोफत प्रदर्शन



जन सम्राट टाईम्स

धुळे | प्रतिनिधी : महाराष्ट्र दिनानिमित्त धुळे जिल्ह्यात युवासेनाच्या वतीने ‘राजा शिवाजी’ या ऐतिहासिक चित्रपटाचे भव्य आणि मोफत प्रदर्शन करण्यात आले. राज्यभर राबविण्यात आलेल्या या उपक्रमाला धुळेकरांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत चित्रपटगृहात मोठी गर्दी केली. नेतृत्वाच्या मार्गदर्शनाखाली यशस्वी आयोजन हा उपक्रम राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, खासदार डॉ. श्रीकांत शिंदे, युवासेना कार्याध्यक्ष पूर्वेश सरनाईक यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडला. तसेच राहुल लोंढे, किरण साळी, आविष्कार भुसे, प्रथमेश पाटील, मनोज मोरे यांच्यासह स्थानिक पदाधिकाऱ्यांनी या उपक्रमात सक्रिय सहभाग नोंदवला. शिवरायांच्या इतिहासाचा जागर ‘गर्जा महाराष्ट्र माझा’च्या घोषणांनी परिसर दुमदुमून गेला होता. छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जाज्वल्य इतिहासावर आधारित चित्रपटातून शिवरायांचा पराक्रम आणि महाराष्ट्राची अस्मिता नव्या पिढीपर्यंत पोहोचवण्याचा प्रयत्न करण्यात आला. शिवप्रेमींचा उत्स्फूर्त प्रतिसाद या उपक्रमाला युवासैनिकांसह शिवप्रेमी नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थिती दर्शवली. मोठ्या पडद्यावर शिवरायांचा इतिहास अनुभवताना प्रेक्षकांमध्ये उत्साहाचे वातावरण पाहायला मिळाले. सामाजिक आणि सांस्कृतिक संदेश युवासेनेच्या या उपक्रमातून महाराष्ट्राच्या इतिहासाची जाणीव आणि अभिमान समाजात रूजवण्याचा संदेश देण्यात आला. धुळे जिल्ह्यातील हा उपक्रम सामाजिक आणि सांस्कृतिक एकात्मतेचे प्रतीक ठरला आहे.

Selected

### विनयभंग केल्यानंतर सेवानिवृत्त प्राचार्य फरार

गोंदिया : जिल्ह्यातील देवरी येथील सेवानिवृत प्राचार्यान एका १५ वर्षीय मुलीचा विनयभंग केल्याची घटना २८ एप्रिल रोजी घडली होती. या घटनेला ६ दिवस लोटूनही आरोपी अद्याप फरार आहे. आरोपीच्या शोधत पोलीस पथके रवाना झाली आहेत, अशी माहिती जिल्हा पोलिस अधीक्षक गोरख भामरे यांनी दिली.

### पदक मिळाल्यानंतर अधिकारी, कर्मचाऱ्यांना वेतनवाढ सुरू करा

मुंबई : राज्य पोलीस दलात पोलीस महासंचालक पदक व राष्ट्रपती पोलीस पदक मिळाल्यानंतर अधिकारी व कर्मचाऱ्यांना वेतन वाढ तात्काळ सुरू करावी. यासाठी शासनाने पोलीस महासंचालक पदकासाठी एक आणि राष्ट्रपती पोलीस पदकासाठी दोन वेतनवाढ द्याव्यात.

### अवयवदान शपथ घेण्यात महाराष्ट्र अव्वल !

मुंबई : अवयवदानाबाबतच्या जागरूकतेत महाराष्ट्राने देशात पहिला क्रमांक पटकावत मानवतेचा नवा आदर्श निर्माण केला आहे. आकडेवारीनुसार, राज्यात तब्बल १,१५,६८२ नागरिकांनी अवयवदानाची शपथ घेतली. अवयवदानाच्या चळवळीत महाराष्ट्राने घेतलेली आघाडी ही केवळ आकड्यांची नव्हे, तर समाजातील वाढत्या संवेदनशीलतेची साक्ष आहे.

# जळगावात महाराष्ट्र दिन उत्साहात; पालकमंत्री गुलाबराव पाटील यांच्या हस्ते ध्वजारोहण!

## पोलीस कवायत मैदानावर परेड, जनजागृतीचे देखावे

जन सम्राट टाईम्स

**जळगाव| प्रतिनिधी :** महाराष्ट्र दिन निमित्त जळगाव येथील पोलीस कवायत मैदानावर विविध कार्यक्रम उत्साहात पार पडले. पालकमंत्री गुलाबराव पाटील यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. परेड व जनजागृती कार्यक्रम ध्वजारोहणानंतर पोलीस दलाकडून भव्य परेड सादर करण्यात आली. तसेच पोलीस कर्मचाऱ्यांनी विविध सामाजिक जनजागृती विषयांवर आकर्षक देखावे सादर करून उपस्थितांचे लक्ष वेधून घेतले. अधिकारी-कर्मचाऱ्यांचा सन्मान या कार्यक्रमात जिल्ह्यातील ५ अधिकाऱ्यांसह २७ अंमलदार



कर्मचारी यांचा पदक देऊन सन्मान करण्यात आला. त्यांच्या कर्तव्यनिष्ठ सेवेबद्दल त्यांचा गौरव करण्यात आला. मान्यवरांची उपस्थिती या प्रसंगी जिल्ह्यातील राजकीय, सामाजिक व शैक्षणिक क्षेत्रातील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते. देशभक्ती आणि सामाजिक बांधिलकीचा संदेश देणारा हा सोहळा उत्साहात पार पडला.



# जळगावातील रस्त्यावरील मोठा खड्डा ठरत आहे अपघाताचे कारण

## पेट्रोल पंपाजवळील धोकादायक स्थिती

जन सम्राट टाईम्स

**जळगाव| प्रतिनिधी :** जळगाव शहरातील कानडदा रोडवर, सुरेश कलेक्शनकडे जाणाऱ्या मार्गावर पेट्रोल पंपाजवळ पडलेल्या मोठ्या खड्ड्यामुळे वाहतुकीचा प्रश्न गंभीर बनला आहे. रस्त्याच्या मधोमध असलेल्या या खड्ड्यामुळे चारचाकी व दुचाकी वाहनचालकांना मोठा त्रास सहन करावा लागत असून वारंवार अपघाताच्या घटना घडत आहेत. या भागात जवळच लॉन्स असल्यामुळे विवाह समारंभ व इतर मोठे कार्यक्रम नियमितपणे होत असतात. त्यामुळे वाहतुकीची मोठी गर्दी असते. अशा परिस्थितीत वाहनचालक खड्डा टाळण्याच्या प्रयत्नात समोरासमोर येत असून




अपघाताचा धोका वाढला आहे. अनेक वेळा येथे वाहतूक कोंडीही निर्माण होत असल्याचे नागरिकांनी सांगितले. प्रशासनाचे दुर्लक्ष? स्थानिक नागरिकांनी या खड्ड्याबाबत वारंवार तक्रारी करूनही संबंधित जळगाव महानगरपालिका आणि स्थानिक नगरसेवकांनी अद्याप ठोस कारवाई केली नसल्याचा आरोप करण्यात येत आहे. तात्काळ दुरुस्तीची मागणी हा खड्डा किरकोळ स्वरूपाचा असूनही त्याकडे दुर्लक्ष होत असल्याने नागरिकांमध्ये नाराजी व्यक्त होत आहे. संभाव्य अपघात टाळण्यासाठी आणि वाहतूक सुरळीत करण्यासाठी संबंधित अधिकाऱ्यांनी तातडीने खड्ड्याची दुरुस्ती करावी, अशी मागणी नागरिकांकडून जोर धरत आहे.

# जळगाव जिल्ह्यात ‘उष्माघात कक्ष’ उभारण्याची मागणी

## पर्यावरण संवर्धन व विकास समितीचे जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन

गुरु शिंदे
जन सम्राट टाईम्स

**जळगाव/भुसावळ :** प्रतिनिधी जिल्ह्यात दिवसेंदिवस वाढत असलेल्या तापमानाच्या पार्श्वभूमीवर नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न गंभीर बनत चालला आहे. उन्हाच्या तीव्र झळांमुळे उष्माघाताचा धोका वाढत असल्याने जळगाव जिल्ह्यातील प्रमुख रहदारीच्या ठिकाणी तात्पुरते ‘उष्माघात कक्ष’ (Heat Stroke Relief Center) उभारण्यात यावेत, अशी मागणी पर्यावरण संवर्धन व विकास समितीचे जिल्हाध्यक्ष देवेंद्र वराडे यांनी जिल्हाधिकाऱ्यांकडे निवेदनाद्वारे केली आहे.सध्या जिल्ह्यात तापमानाचा पारा सातत्याने



वाढत असून नागरिकांना चक्कर येणे, डिहायड्रेशन, रक्तदाब कमी होणे यांसारख्या समस्यांना सामोरे जावे लागत आहे. विशेषतः बसस्थानके, रेल्वे स्टेशन, मुख्य बाजारपेठा तसेच चौकांमध्ये मोठ्या प्रमाणात नागरिकांची वर्दळ असते.
अशा ठिकाणी तातडीची मदत उपलब्ध व्हावी यासाठी उष्माघात कक्ष उभारणे अत्यावश्यक असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. या कक्षांमध्ये थंड पिण्याचे पाणी, ORS व ग्लुकोजची व्यवस्था, प्राथमिक उपचार साहित्य, आरोग्य कर्मचाऱ्यांची नियुक्ती तसेच सावली, बसण्याची व्यवस्था, पंखे किंवा कूलर उपलब्ध करून देण्याची मागणी करण्यात आली आहे.
“वाढत्या उष्णतेमुळे संभाव्य जीवितहानी टाळण्यासाठी प्रशासनाने आरोग्य विभागाला तात्काळ सूचना देऊन हे कक्ष सुरू करावेत,” असे आवाहन देवेंद्र वराडे यांनी केले आहे. जनसामान्यांच्या आरोग्याच्या दृष्टीने प्रशासनाने या मागणीकडे गांभीर्याने लक्ष देऊन तातडीने कार्यवाही करावी, अशी अपेक्षाही समितीच्या वतीने व्यक्त करण्यात आली आहे.

जन सम्राट टाईम्स — ब्रेक न्यूज

# महाराष्ट्र दिन व कामगार दिनानिमित्त कष्टकऱ्यांचा गौरव

## पालकमंत्र्यांच्या मार्गदर्शनाखाली सन्मान सोहळा



जन सम्राट टाईम्स

**जळगाव | प्रतिनिधी :** महाराष्ट्र राज्य स्थापना दिन आणि जागतिक कामगार दिन या दुहेरी औचित्याचे औचित्य साधत जळगावात शिवसेनातर्फे कष्टकरी कामगारांचा विशेष सन्मान करण्यात आला. येथील शिवसेना मध्यवर्ती संपर्क कार्यालयात १ मे रोजी हा कार्यक्रम उत्साहात पार पडला. पालकमंत्री गुलाबराव पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली आणि शिवसेना वैद्यकीय मदत कक्षाचे उत्तर महाराष्ट्र प्रमुख जितेंद्र गवळी यांच्या पुढाकारातून या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. कामगारांच्या कष्टांना सलाम ऊन, वारा आणि पावसाची पर्वा न करता समाजव्यवस्थेचा कणा म्हणून काम करणाऱ्या कामगारांप्रती कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला. “कामगार हा केवळ अर्थव्यवस्थेचा घटक नसून समाजाचा आधारस्तंभ आहे,” असा संदेश यावेळी देण्यात आला.
शाल-श्रीफळ देऊन गौरव उपस्थित कामगारांचा शाल, श्रीफळ आणि सन्मानचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला. त्यांच्या कार्याला सामाजिक प्रतिष्ठा मिळावी आणि श्रमाचे महत्त्व अधोरेखित व्हावे, हा यामागील मुख्य उद्देश होता. सामाजिक बांधिलकीचा संदेश या उपक्रमामुळे कामगार वर्गात आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून, श्रमाचा सन्मान करणाऱ्या या उपक्रमाचे शहरात सर्व स्तरांतून कौतुक होत आहे. सामाजिक एकोपा आणि कृतज्ञता व्यक्त करणारा हा उपक्रम आदर्श ठरत असल्याचे मत व्यक्त करण्यात आले. शिवसैनिकांची उपस्थिती या कार्यक्रमास राजेंद्र सपकाळे, सागर गवळी, दीपक पाटील, शुभम गवळी, चेतन परदेशी, विजय भाटी, सोनू तायडे, अमोल जगताप, विशाल निकम यांच्यासह शिवसैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# हिंजवडी आयटी पार्कमध्ये महिला सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर!

जन सम्राट टाईम्स

**पिंपरी-चिंचवड | प्रतिनिधी :** हिंजवडी आयटी पार्क परिसरात महिला अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या सुरक्षेचा प्रश्न गंभीर बनला असून, यासंदर्भात तातडीने ठोस उपाययोजना करण्याची मागणी जोर धरू लागली आहे. रात्री उशिरापर्यंत, अनेकदा पहाटे दोन-तीन वाजेपर्यंत काम करणाऱ्या महिलांना पुरेशी सुरक्षा मिळत नसल्याने भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. भारतीय जनता पार्टीचे कार्यकर्ते सचिन काळभोर यांनी प्रशासनाकडे याबाबत तक्रार करत त्वरित कारवाईची मागणी केली आहे. रात्रपाळीत सुरक्षेचा गंभीर अभाव आयटी कंपन्यांमध्ये रात्रपाळीत काम करणाऱ्या महिला कर्मचाऱ्यांना कंपनी परिसरात पुरेशी सुरक्षा नसल्याच्या तक्रारी सातत्याने समोर येत आहेत. अनेक ठिकाणी सीसीटीव्ही कॅमेरे बंद अवस्थेत असल्याचे निदर्शनास आले असून, त्यामुळे सुरक्षेचा प्रश्न अधिकच गंभीर बनला आहे. कार्यालय परिसरात आणि बाहेर अंधार, कमी सुरक्षा रक्षक आणि दुर्लक्षामुळे महिलांमध्ये असुरक्षिततेची भावना वाढत आहे. छेडछाड आणि गुन्हेगारीची भीती वाढली परिसरात गावगुंड व मद्यपींकडून महिलांना छेडछाड होत असल्याचे आरोप करण्यात आले आहेत.

# महाराष्ट्र दिनी भुसावळ नगरपालिकेत कर्मचाऱ्यांच्या प्रश्नांचा मुद्दा ऐरणीवर!

करण शिंदे
जन सम्राट टाईम्स

**भुसावळ । प्रतिनिधी :** महाराष्ट्र दिन आणि कामगार दिनाच्या पार्श्वभूमीवर भुसावळ नगरपालिकेत आयोजित ध्वजारोहण कार्यक्रमात यंदा केवळ औपचारिकता नव्हे, तर कर्मचाऱ्यांच्या प्रश्नांवर ठोस चर्चा रंगल्याचे चित्र पाहायला मिळाले. उपनगराध्यक्ष शैलजा नारखेडे यांच्या हस्ते ध्वजारोहण पार पडले. यावेळी नगरपालिका कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमानंतर माध्यमांशी संवाद साधताना भुसावळचे तरुण नगरसेवक रोहन राजू भाऊ सूर्यवंशी यांनी नगरपालिका कर्मचाऱ्यांच्या आरोग्य, शिक्षण, कामाच्या सुविधा आणि श्रमिकांच्या मूलभूत प्रश्नांचा मुद्दा थेट उपस्थित करून प्रशासनाचे लक्ष वेधले. “वर्षानुवर्षे शहरासाठी राबणाऱ्या कर्मचाऱ्यांचे प्रश्न फक्त फाईलमध्ये राहू नयेत. त्यांना न्याय मिळालाच पाहिजे,” अशा ठाम शब्दांत रोहन सूर्यवंशी यांनी आपली भूमिका मांडली. उपस्थित नगरसेवकांसमोर त्यांनी कर्मचाऱ्यांच्या प्रलंबित प्रश्नांवर विशेष पाठपुरावा करून ते लवकरात लवकर मार्गी लावण्याचे जाहीर आश्वासन



दिले. कामगार दिनाच्या दिवशीच श्रमिकांच्या अडचणींना वाचा फोडत नगरपालिकेतील वास्तव परिस्थिती समोर आणल्याने या भूमिकेची शहरभर चर्चा सुरू झाली आहे. विशेष म्हणजे, केवळ राजकीय भाषणांपुरते मर्यादित न राहता प्रत्यक्ष कर्मचाऱ्यांच्या प्रश्नांवर भूमिका घेणारा तरुण चेहरा म्हणून रोहन सूर्यवंशी यांच्याकडे पाहिले जात आहे. दरम्यान, शहरातील विविध कर्मचारी संघटनांकडूनही त्यांच्या भूमिकेचे स्वागत करण्यात येत असून, “कामगारांच्या प्रश्नांवर आवाज उठवणारे लोकप्रतिनिधी आता पुढे यायला हवेत,” अशा प्रतिक्रिया उमटत आहेत. भुसावळ शहरात वाढत्या नागरी समस्या, मनुष्यबळावरील ताण आणि कर्मचाऱ्यांच्या सुविधांचा प्रश्न गंभीर होत असताना, महाराष्ट्र दिनी उपस्थित करण्यात आलेला हा मुद्दा आगामी काळात नगरपालिकेच्या राजकारणात महत्त्वाचा ठरण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

# श्रीक्षेत्र कुंडलेश्वर गोशाळेच्या चारा गोदामाला आग; १० लाखांचे नुकसान

जन सम्राट टाईम्स

**बेळी:** श्रीक्षेत्र कुंडलेश्वर येथील सद्गुरु झेंडूजी महाराज बेळीकर संस्थान अंतर्गत असलेल्या भगवान श्रीकुंडलेश्वर गोशाळेच्या चारा गोदामाला शुक्रवारी दुपारी भीषण आग लागून सुमारे १० लाख रुपयांचे नुकसान झाल्याची घटना घडली. कडक उन्हामुळे लागलेल्या या आगीत मोठ्या प्रमाणात साठवून ठेवलेला चारा जळून खाक झाला. दुपारी अचानक लागली आग शुक्रवारी दुपारी सुमारे १.३० वाजता, प्रचंड उष्णतेच्या पार्श्वभूमीवर गोशाळेतील वाळलेल्या चाऱ्याच्या गोडाऊनला अचानक आग लागली. वाऱ्याचा वेग आणि कोरडा चारा यामुळे काही क्षणांतच आगीने रौद्र रूप धारण केले. या आगीत अंदाजे १०० आयशर इतका चारा भस्मसात झाला. युद्धपातळीवर बचावकार्य घटनेची माहिती मिळताच स्थानिक ग्रामस्थ, तरुण मंडळ व संस्थेचे सेवेकरी घटनास्थळी धावले. योगेश पाटील यांनी तातडीने नशिराबाद अग्निशमन दल पाठवले. अग्निशमन दल व नागरिकांच्या संयुक्त प्रयत्नांनी



आग आटोक्यात आणण्यात यश आले. तसेच, जेसीबीच्या मदतीने उर्वरित चारा वाचवण्याचे प्रयत्न करण्यात आले. वेळेत मदत पोहोचल्याने मोठी हानी टळली. गायींच्या चाऱ्याचा प्रश्न गंभीर या गोशाळेत सध्या ३०० ते ३५० गायींचा सांभाळ केला जातो. उन्हाळ्यामुळे आधीच चाऱ्याची टंचाई असताना, आता मोठा साठा नष्ट झाल्याने जनावरांच्या खाद्याचा प्रश्न अधिकच गंभीर बनला आहे. मदतीचे आवाहन या संकटातून सावरण्यासाठी दानशूर व्यक्ती, संस्था आणि गोभक्तांनी पुढे येण्याचे आवाहन करण्यात आले आहे. चारा किंवा आर्थिक मदत करू इच्छिणाऱ्यांनी थेट संस्थेशी संपर्क साधावा, असे गोसेवकांनी सांगितले.

# कल्याण-डोंबिवलीत अनधिकृत बांधकामांवर धडक कारवाई!



संदीप शेंडगे
जन सम्राट टाईम्स

कल्याण : कल्याण डोंबिवली महानगरपालिकेच्या अ प्रभाग क्षेत्रात अनधिकृत बांधकामांविरोधात मोठी आणि धडक कारवाई करण्यात आली. आयुक्त अभिनव गोयल यांच्या आदेशाने सहाय्यक आयुक्त जयवंत चौधरी यांच्या मार्गदर्शनाखाली ही धडक कारवाई राबवण्यात आली असून यावेळी१५० तयार खोल्यांचे बांधकाम आणि ७० हून अधिक जोते जमीनदोस्त करण्यात आली. या मोठ्या मोहिमेमुळे अनधिकृत बांधकाम करणाऱ्या बांधकाम व्यवसायिकांमध्ये खळबळ उडाली असून बांधकाम व्यवसायिकांचे चांगलेच धाबे दणाणले आहेत. ही कारवाई स्थानिक नगरसेवक राहुल मुकुंद कोट यांच्या तक्रारीची दखल घेऊन करण्यात आल्याची माहिती समोर आली आहे. वारंवार सातत्याने तक्रार करूनही पालिका प्रशासन दुर्लक्ष करीत आल्याची तक्रार नगरसेवकांनी थेट आयुक्तांकडे केली होती. त्यामुळे पालिका प्रशासनाने या प्रकरणाला गांभीर्याने घेत तातडीने बल्यानी परिसरातील एनआरसी गोडाऊन च्या लगत असलेल्या दीडशेहून अधिक खोल्या जमीनदोस्त करण्यात आल्या आहेत. कारवाईदरम्यान कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी मोठ्या प्रमाणात पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला होता. विशेष म्हणजे, ही संपूर्ण कारवाई अतिशय गुप्तपणे नियोजित करण्यात आली होती. कुठे कारवाई होणार याची कल्पना ना पोलिसांना होती ना कर्मचारी आणि अधिकाऱ्यांना अनेक कर्मचाऱ्यांनाही शेवटच्या क्षणापर्यंत ताफा कुठे जाणार आहे कोठे कारवाई होणार आहे याची कल्पना नव्हती. महापालिकेच्या या अचानक आणि कठोर कारवाईमुळे अनधिकृत बांधकाम करणाऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले असून, प्रशासनाच्या भूमिकेचे नागरिकांकडून स्वागत केले जात आहे. जमीनदोस्त करण्यात आलेल्या दीडशेहून अधिक खोल्या ह्या नवीनच तयार झाल्याचे दिसून येत होते त्यामुळे खोल्या तयार होताना प्रशासन काय करत होते असा सवाल नागरिकांनी उपस्थित केला आहे तसेच इतक्या मोठ्या प्रमाणात खोल्या तयार होत असताना प्रशासनाला खबर का लागली नाही असा सवाल नागरिक उपस्थित करीत आहेत. काही कर्मचारी काही अधिकारी यामध्ये बांधकाम व्यवसायिकांशी साठे लोटे तर नाही ना अशी चर्चा दबक्या आवाजात सुरू आहे.

जन सम्राट टाईम्स — अँकर न्यूज

# नशिराबादचे ग्रामदैवत प.पू. झिपरु अण्णा महाराज यांचा पुण्यतिथी सोहळा

## ४ ते ११ मे दरम्यान धार्मिक कार्यक्रमांची रेलचेल; पालखी मिरवणूक व महाप्रसादाचे आयोजन

जन सम्राट टाईम्स

**नशिराबाद:** नशिराबादचे ग्रामदैवत प.पू. श्री झिपरु अण्णा महाराज यांच्या ७७ व्या पुण्यतिथीनिमित्त ४ मे ते ११ मे २०२६ या कालावधीत विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. या सोहळ्यानिमित्त ह.भ.प. श्री. गोपाळ महाराज गारमोडे यांच्या रसाळ वाणीतून ‘श्री नवनाथ भक्तिसार’ कथेचे आयोजन करण्यात आले असून भाविकांमध्ये उत्साहाचे वातावरण आहे. ध्वजारोहणाने सोहळ्याचा शुभारंभ सोमवार, दि. ४ मे रोजी सकाळी



९ वाजता ध्वजारोहणाने उत्सवाची सुरुवात होणार आहे. त्याच दिवशी सायंकाळी ६ वाजता दीपोत्सव साजरा केला जाईल. दररोज सायंकाळी ७ ते १० या वेळेत कथामृताचा लाभ भाविकांना मिळणार आहे. महत्त्वाचे धार्मिक विधी ७ मे (गुरुवार): सकाळी ९.३० ते ११.३० – श्रींच्या पोथीचे पारायण ९ मे (शनिवार): सकाळी ९ ते ११ – श्रीमद् भगवद्गीता सामूहिक पारायण १० मे (रविवार): सकाळी ७.३० – सत्यनारायण महापूजा; सकाळी १० ते १२ – कीर्तन व सत्संगपालखी मिरवणूक व महाप्रसाद सोमवार, दि. ११ मे रोजी सोहळ्याची सांगता होणार असून सकाळी ७ वाजता श्रींच्या पादुकांची पालखी मिरवणूक गावातून काढण्यात येईल.
त्यानंतर काल्याचे भजन होऊन दुपारी १२ ते ४ या वेळेत महाप्रसादाचे वाटप करण्यात येणार आहे. भजनी मंडळांचा सहभाग या सोहळ्यात श्री मुक्तेश्वर मंदिर, श्री सावता महाराज मंदिर, श्री विठ्ठल मंदिर, श्री ज्ञानेश्वर मंदिर आणि श्रीकृष्ण मंदिर येथील भजनी मंडळांचा सहभाग राहणार आहे. भाविकांना आवाहन नशिराबाद व परिसरातील भाविकांनी या पुण्यतिथी सोहळ्याचा लाभ घ्यावा, तसेच धार्मिक कार्यक्रम आणि महाप्रसादात सहभागी व्हावे, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

### श्रींच्या पादुकांची पालखी मिरवणूक

सोमवार, दि. ४ मे रोजी सकाळी ९ वाजता ध्वजारोहणाने उत्सवाची सुरुवात होणार आहे. त्याच दिवशी सायंकाळी ६ वाजता दीपोत्सव साजरा केला जाईल. दररोज सायंकाळी ७ ते १० या वेळेत कथामृताचा लाभ भाविकांना मिळणार आहे. महत्त्वाचे धार्मिक विधी ७ मे (गुरुवार): सकाळी ९.३० ते ११.३० – श्रींच्या पोथीचे पारायण ९ मे (शनिवार): सकाळी ९ ते ११ – श्रीमद् भगवद्गीता सामूहिक पारायण १० मे (रविवार): सकाळी ७.३० – सत्यनारायण महापूजा; सकाळी १० ते १२ – कीर्तन व सत्संगपालखी मिरवणूक व महाप्रसाद सोमवार, दि. ११ मे रोजी सोहळ्याची सांगता होणार असून सकाळी ७ वाजता श्रींच्या पादुकांची पालखी मिरवणूक गावातून काढण्यात येईल.